सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

संचालनालय, लेखा व कोषागारे

"कस्तुरी" इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०.

दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२८८०१०६ ई-मेल : aaomahapardat.mu-mh@gov.in

पहा : १. शासन वित्त विभाग अधिसूचना क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा ९ दि.३०.०१.२०१९

२. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.वेपूर -२०१९/प्र.क्र.८/सेवा ९ दि.२०.०२.२०१९

३. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र.१५/सेवा ९ दि.१४.०५.२०१९

४.जिल्हा परिषद गडचिरोली यांचे आदेश क्र.११५६/२०२१ दि.२९.१०.२०२१.

****

क्र.संलेको ०६.२०२६/गोअक/क.ले.२/वे.वा.जून २०२६/लेखाधिकारी संवर्ग/264 दि.22.06.2026

आ दे श

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या लेखाधिकारी संवर्गातील श्री.मदन कचेश्वर वाघ हे दि.१६.०२.२०२१ ते दि.१४.१०.२०२४ या कालावधीत जिल्हा परिषद, गडचिरोली या कार्यालयात लेखा अधिकारी या पदावर कार्यरत होते. सदर कार्यालय हे आदिवासी/नक्षलग्रस्त भागात येत असल्याने या कालावधीकरीता एकस्तर नुसार श्री.वाघ यांचे वेतननिश्चिती आदेश जिल्हा परिषद, गडचिरोली कार्यालयाकडून निर्गमित केलेले आहेत.

तथापि सदयस्थितीत श्री.वाघ हे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, मुंबई या प्रतिनियुक्तीच्या कार्यालयात लेखाधिकारी या पदावर दि.२४.१०.२०२४ रोजी रुजू झाले आहेत. त्यामुळे त्यांची नागरी भागानुसार वेतनवाढ निर्गमित करणे आवश्यक ठरते, याकरीता श्री.वाघ, यांची नागरी भागानुसार वेतननिश्चिती खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम	वेतनवाढ दिनांक	नियमित वेतन स्तर	नियमित वेतन
१.	श्री.मदन कचेश्वर वाघ लेखाधिकारी, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, मुंबई.	दि.०१.०७.२०२१ रोजीचे वेतन	S-१६	६०४००
		दि.०१.०७.२०२२	S-१६	६२२००
		दि.०१.०७.२०२३	S-१६	६४१००
		दि.०१.०७.२०२४	S-१६	६६०००
		दि.०१.०७.२०२५	S-१६	६८०००

वेतनवाढीच्या दिनांकास रजेवर असल्यास ते ज्या दिवशी रजेवरून हजर होतील त्या दिनांकापासून त्यांची वेतनवाढ प्रभावी होईल.

(रश्मी नांदिवडेकर)

सहसंचालक (प्रशासन)

लेखा व कोषागारे, मुंबई

प्रत सस्नेह सादर:

१. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे पदावरील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे पदावरील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.gov.in या संकेतस्थळावरील Circulars & Orders या मथळयाखाली उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यांची वार्षिक वेतनवाढ देण्याबाबत संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

२.संबंधित अधिकारी

३.निवडनस्ती

D:\क.ले.2\वार्षिक वेतनवाढ\वार्षिक वेतनवाढ जुलै 2025\AO 2025.Docx